## मंदिरे सुरू करण्याच्या मागणीसाठी

# भाजपचा राज्यभर घंटानाद

### राज्य सरकारची दडपशाही; आंदोलकांवर पोलीस बळाचा वापर

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी):** 'अनलॉक –५'अंतर्गत बहुतेक व्यवहार सुरळीत होत असताना अजून मंदिरे खुली करण्याकडे राज्य सरकार दुर्लक्ष करत असल्याने आज भाजपच्यावतीने राज्यभर आंदोलन करण्यात आले. मंदिरांबोहर लाक्षणिक उपोषण, घंटानाद, सामूहिक आरती आणि सरकारच्या विरोधात घोषणाबाजी अशा प्रकारचे हे आंदोलन होते. मात्र, सरकाच्यावतीने पोलिसांकडून आंदोलकांवर दडपशाही करण्यात आली. आंदोलकांची धरपकड करून त्यांनी पोलिसांच्या गाडीत कोंबण्यात आले. मात्र, कितीही धरपकड करण्यात आली तरी भाजपच्यावतीने आंदोलन चालूच ठेवण्यात आले. आज सकाळपासूनच पुणे, शिर्डी, कोल्हापूर आणि नागपूरमध्ये भाजपचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. शिर्डीत भाजपच्या आध्यात्मिक समन्वय समितीकडून आंदोलन सुरू करण्यात आले. याठिकाणी धर्मगुरू आणि आचार्यांकडून लाक्षणिक उपोषण केले गेले. तसेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविरोधात 'मंदिरे बंद, उघडले बार; उद्धवा, धुंद तुझे सरकार' अशी फलकबाजीही करण्यात आली.




**सिद्धिविनायक मंदिराबाहेर घंटनाद**

भाजपने सकाळी ११ वाजता मुंबईतील सिद्धिविनायक मंदिराच्या दारात घंटानाद आंदोलनाला सुरुवात केली. या आंदोलनात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, आमदार प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनात पक्षाचे आमदार, खासदार आणि नगरसेवक सहभागी झाले.

**पुण्यात वाद्यांचा गजर**

पुण्यात शहर भाजपच्यावतीने शहराचे ग्रामदैवत असलेल्या तांबडी जोगेश्वरी मंदिराबाहेर विविध वाद्यांचा गजर करत हे आंदोलन करण्यात आले. कुंभकर्णासारख्या गाढ झोपलेल्या सरकारला प्रतीकात्मक जागे करण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी भाजपकडून सांगण्यात आले. खासदार गिरीश बापट यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनात शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सरकारविरोधी घोषणाही देण्यात आल्या.

**सांगलीत टाळ–मृदंगाचा निनाद**

सांगलीत टाळ–मृदंग वाजवून सरकारला जागे करण्यासाठी आंदोलन करण्यात आले. भाजपच्या आध्यत्मिक आघाडीच्यावतीने आज सकाळी १० वाजता गणपती मंदिरासमोर टाळ–मृदंग वाजवून सरकारला जागे करण्यासाठी कीर्तनकार, भक्तमंडळी, वारकरी यांच्या उपस्थितीमध्ये आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात भाजपचे आमदार सहभागी झाले आहेत.

**कोल्हापुरात मंदिरबाहेर निदर्शने**

हॉटेल, बार, मॉल सुरू केले असले तरी मंदिर बंद ठेवल्याच्या निषेधार्थ भाजप आक्रमक झाली आहे. भाजपच्यावतीने कोल्हापुरातील शेष नारायण मंदिराबाहेर निदर्शने करण्यात आली.

**सोलापुरात मल्लिकार्जुन मंदिराजवळ आंदोलन**

मंदिरे खुली करण्याच्या मागमीसाठी सोलापुरातील मल्लिकार्जुन मंदिर इथे आंदोलन करण्यात आले. याआधीही भाजप आणि वंचित बहुजन आघाडीतर्फे सोलापुरात आंदोलन करण्यात आले होते. आज बळीवेस परिसरातील मल्लिकार्जुन मंदिरबाहेर आंदोलन करण्यात आले.

**परभणीत ५० मंदिरांमध्ये आंदोलन**

धार्मिक स्थळे सुरू करण्याच्या मागणीसाठी परभणीत ५० मंदिरांसमोर आंदोलन करण्यात आले.

**पंढरपुरात नामदेव पायरीसमोर ठिय्या**

भाजप जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पंढपूर येथे विठ्ठल मंदिरातील नामदेव पायरीसमोर आंदोलन छेडण्यात आले.

**नागपुरात साई मंदिरासमोर आंदोलन**

नागपुरातही वर्धा रोडवरील प्रसिद्ध साई मंदिरासमोर भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार प्रवीण दटके यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. 'मंदिरे बंद, उघडले बार, उद्धवा बेधुंद तुझे सरकार' या घोषणेसह झालेल्या आंदोलनात भाजपचे अनेक नेते सहभागी झाले. साई मंदिरासमोर सकाळी १० वाजता सुरु झालेले हे आंदोलन एक तास सुरु होते. या आंदोलनात सरकारला सद्‌बुद्धी यावी यासाठी घंटा आणि टाळ वाजवत आंदोलन केले. मंदिरांमधून अनेक कुटुंबांचे रोजगार असून त्यांची उपासमार होत आहे, लोक नैराश्यात जात आहेत. त्यामुळे नवरात्रपूर्वी मंदिरे उघडा नाही तर हे आंदोलन उद्या तीव्र रूप धारण करील, असा इशारा भाजपने दिला आहे.

## धाकदपटशा दाखवून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न

### विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचा आरोप

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी):** मुंबईत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखाली सिद्धिविनायक मंदिरासमोर भाजपकडून आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी सिद्धिविनायक मंदिरांत प्रवेश करण्याचा प्रयत्न करताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यावेळी पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये झटापटही झाली. पोलिसांनी आंदोलकांना रोखताच भाजपच्या कार्यकर्त्यांकडून रस्त्यावरच गणपतीची आरती करण्यात आली. भाजपच्या नेत्यांनी मंदिरात शिरण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलिसांनी प्रवीण दरेकर आणि प्रसाद लाड यांच्यासह इतर कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. 'आम्हाला मंदिरात प्रवेश दिला नाही, तर मंदिराच्या गाभाऱ्यात जाणार आणि परमेश्वरालाच साकडे घालणार. आम्ही मंदिरात प्रवेश करणारच',अशी आक्रमक भूमिका प्रवीण दरेकर यांनी घेतली होती. मात्र, या सर्वांनी मंदिरात शिरायचा प्रयत्न केला तेव्हा पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन गाडीत कोंबले. यानंतर




प्रवीण दरेकर यांनी राज्य सरकारवर टीका केली.

धाकदपटशा दाखवून आमचे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला, असा आरोप प्रवीण दरेकर यांनी केला. ही लोकशाही नाही, तर हुकूमशाही आहे, असेही दरेकर म्हणाले. प्रवीण दरेकर यांनी राज्य सरकारवर सडकून टीका केली. महाराष्ट्रात वाईन शॉप आणि बार सुरू होतात. मात्र, आमचे श्रद्धास्थान असलेली मंदिरे उघडण्यास सरकारने अद्याप परवानगी दिलेली नाही. मुख्यमंत्री सोईने स्वत:ची जबाबदारी जनतेवर ढकलत आहेत. मंदिरे बंद ठेवून सरकार बार सुरू करते. त्यामुळे हे सरकार नेमके कुठे चाललेय, असा सवाल प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला. मंदिरांना हवे तर रेस्टॉरंट आणि जिमसारखे नियम लावा. पण मंदिरे उघडाच, अशी मागणीही दरेकर यांनी केली.

**...तर उपासमारीने मृत्यू**

मंदिरांवर अनेक लोकांचा रोजगार अवलंबून आहे. मात्र, 'लॉकडाऊन'पासून मंदिरे बंद असल्याने अनेकांची रोजी–रोटी बुडाली आहे. मंदिरे सुरु झाली नाही तर लोक कोरोनाऐवजी उपासमारीने मरतील, असेही दरेकर म्हणाले.


**वाढदिवशीही दरेकर जनसेवेसाठी कार्यरत**

प्रवीण दरेकर यांचा आज वाढदिवस होता. मात्र, कोरोनापाठोपाठ राज्यावर एकामागून एक अशा आलेल्या संकटांमुळे त्यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला. वाढदिवसानिमित्त बॅनरबाजी, काही ठिकाणी होणारे कार्यक्रम रद्द करून, अशा कार्यक्रमासाठी होणारा खर्च मुख्यमंत्री मदतनिधीसाठी देण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. तसेच मागाठाणे विधानसभा मतदारसंघात त्यांनी रक्तदान शिबीरही आयोजित केले होते. मात्र, हे कार्यक्रम कार्यकर्त्यांवर सोपवून प्रवीण दरेकर मंदिर उघडण्यासाठी चाललेल्या आंदोलनात सहभागी झाले आणि वाढदिवशीच त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

## मुख्यमंत्र्यांचे उत्तर अतिशय दुर्दैवी!

### विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी):** ''मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना ज्या भाषेत पत्र पाठवले आहे ते अतिशय दुर्दैवी आहे,'' अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. जामनेर येथे 'ग्लोबल महाराष्ट्र' रुग्णालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते पत्रकारांशी बोलत होते.



''राज्यपालांकडे जी निवेदने येत असतात, त्यासंबंधी पत्र लिहून ते मुख्यमंत्र्यांकडे पाठवत असतात. त्या पत्रांबाबत मुख्यमंत्र्यांनी योग्य तो निर्णय घ्यायचा असतो. पण, मुख्यमंत्री उद्धव यांनी ज्याप्रकारे पत्र पाठवले आहे,'' ते दुर्दैवी आहे, असे फडणवीस म्हणाले. शिवसेना स्वत:ला हिंदुत्ववादी पक्ष असल्याचे म्हणतो. छत्रपती शिवाजी महाराजांची लढाई लढत असल्याचे सांगतो. पण, त्यांच्या सत्तेच्या काळात मंदिरांवर अन्याय होतो याबद्दल आश्चर्य वाटते. मंदिरांमुळे केवळ भाविकांचीच आबाळ होते असे नाही, तर त्याचा छोट्या व्यावसायिकांनाही फटका बसतो. त्यामुळे सरकारला सुबुद्धी मिळो आणि लवकरात लवकर मंदिरे उघडण्याचा निर्णय घेवो,'' असेही ते म्हणाले. तीन पक्षांच्या ''सरकारमध्ये स्वत:ला हिंदुत्ववादी समजणारी शिवसेनादेखील आहे. त्यांच्या राज्यात इतका मोठा अन्याय का,'' असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विचारला आहे.

## 'सोनियासेना' बाबरसेनेपेक्षाही वाईट

### अभिनेत्री कंगना राणावतचा पुन्हा ट्विटरवरून हल्ला

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी):** मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांच्या 'लेटरवॉर'मध्ये कंगनाने उडी घेतली असून, बाबरसेनेपेक्षा 'सोनियासेना' फार वाईट असल्याचे म्हटले आहे.



उद्धव ठाकरे यांच्या इशाऱ्यावरून महापालिकेने कंगनाचे खार येथील ऑफिस तोडले होते. ते प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे. त्यावरून कंगनाने उद्धव यांच्यावर जहाल टीका केली होती. आताही राज्यपालांना दिलेल्या पत्रात उद्धव ठाकरे यांनी ''माझ्या राज्याला अथवा माझ्या राज्याच्या राजधानीला पाकव्याप्त काश्मीर म्हणणाऱ्यांचे हसत खेळत घरात स्वागत करणे हे माझ्या हिंदुत्वात बसत नाही,'' असे कंगनाचे नाव न घेता राज्यपालांना टोला लगावला आहे. तिच्या कार्यालयावर कारवाई झाल्याने तिने राज्यपालांकडे तक्रार केली होती. त्या मुद्द्याचा आधार घेत उद्धव ठाकरे यांनी तो टोला लगावला आहे. त्यावरून कंगनाने ट्विट केले आहे की,

''हे पाहून आनंद झाला की 'गुंडा सरकार'ला राज्यपाल प्रश्न विचारत आहेत. राज्यपाल महोदय, गुंडा सरकारने बार आणि रेस्टॉरंट उघडण्याची परवानगी दिली आहे, पण मंदिरे मात्र योजनाबद्ध पद्धतीने बंद करून ठेवली जात आहेत. ही 'सोनियासेना' तर बाबरसेनेपेक्षाही वाईट वर्तवणूक करताना दिसते आहे,'' असे ट्विट अभिनेत्री कंगना राणावतने केले आहे.

## मुलुंडच्या ॲपेक्स रुग्णालयात आगीमुळे दोन रुग्णांचा मृत्यू

**ठाणे, दि. १३ (प्रतिनिधी):** मुलुंड, वीणानगर येथील ॲपेक्स रुग्णालयात सोमवारी सायंकाळी जनरेटरचा स्फोट होऊन आग लागली होती. मुंबई अग्निशमन दलाने तातडीने धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवले होते. यावेळी रुग्णालयात उपचारार्थ दाखल असलेल्या ३८ रुग्णांना इतरत्र हलवण्यात आले होते. मात्र, यापैकी दोन रुग्णांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. पांडुरंग कुलकर्णी (८२) आणि विरेंद्र सिंग (५५) अशी मृतांची नावे आहेत. अशी माहिती मुंबई मनपा आपत्कालीन कक्षाकडून देण्यात आली. दरम्यान,रुग्णालयातील अग्निसुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होत असून सोमवारी विद्युतप्रवाह खंडित झाल्यानंतर ॲपेक्स रुग्णालयात जनरेटरचा वापर करण्यात आल्याचे समोर आले आहे.




## हे कसले हिंदुत्वाचे पुजारी? हे तर सत्येचे लाचारी !

### ठाकरे यांच्या पत्रावर शेलार यांचे चोख उत्तर

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी):** ''मला तुमच्याकडून हिंदुत्वाचे प्रमाणपत्र घेण्याची गरज नाही,'' असे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पत्रातून सांगणाऱ्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना भाजप नेते आ.ॲड. आशिष शेलार यांनी चोख उत्तर दिले आहे. 'हे कसले हिंदुत्वाचे पुजारी? हे तर सत्तेचे लाचारी!' असे म्हणत शेलार यांनी ठाकरे यांच्या पत्राचा चांगलाच समाचार घेतला आहे.



''आज तुमच्या हिंदुत्वाची भेसळ झाल्याने तुम्हाला प्रमाणपत्राची खरी गरज आहे,'' असे प्रत्युत्तर आ. ॲड. शेलार यांनी दिले आहे. शेलार यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे महोदय, आपल्याला आज खरेच हिंदुत्वाचे प्रमाणपत्र घेण्याची वेळ आलेली आहे. याचे कारण हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वापासून तुम्ही केव्हाच फारकत घेतली आहे. प्रतारणा केली आहे. तुम्हाला हे नाकारता येणार नाही. या मुंबईवर आणि भारतावर हल्ला करणाऱ्या याकुबला फाशी झाली. त्यावेळी त्याच्या फाशीला विरोध करणाऱ्यांना तुम्ही तुमच्या मंत्रिमंडळात घेतले आहे. हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करणाऱ्यांना तुम्ही मांडीवर घेऊन बसलात आहात. तुम्हाला हेही नाकारता येणार नाही की, कसाबला बिर्याणी खायला घातली त्यांच्याशी तुम्ही संगनमत केले आहे आणि तुम्हाला हे नाकारता येणार नाही ज्यावेळी पंढरपूरला पुजेला गेलात. त्यावेळी आमच्या विठूरायाच्या चरणाला स्पर्शही केला नाहीत. त्यामुळे तुम्हाला प्रमाणपत्राची खरेच गरज आहे. तुमचे हिंदुत्वाची भेसळ झालेय, देवभूमीतून आलेल्या राज्यपाल महोदय भगतसिंह कोश्यारी यांच्या प्रमाणपत्राची तुम्हाला खरेच गरज आहे. ही काळाची गरज आहे. अयोध्येत रामाच्या मंदिराचे भूमिपूजन ई–पद्धतीने करा,असे अनाहूत सल्ले दिले होते, त्यांना तुम्ही सत्तेत भागीदार केले आहे. 'भारत तेरे तुकडे हो हजार' म्हणाऱ्यांचे मुंबईत स्वागत केले. त्यांच्या कार्यक्रमाला हे चालले होते. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसची संगत ज्यांनी केली, याकुबच्या फाशीला विरोध करणाऱ्यांना ज्यांनी मुंबईचे पालकमंत्री केले, ते कसले हिंदुत्वाचे पुजारी? हे तर सत्तेचे लाचारी!'' असे आशिष शेलार यांनी ट्विटद्वारे म्हटले आहे.

**आशिष शेलारांना धमकीचे फोन**

शेलार यांना धमकीचे फोन येत असून, यासंदर्भात त्यांनी कालच वांद्रे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी दोघांना मुंब्र्यातून अटक करण्यात आली आहे. या गेल्या काही दिवसांपासून आशिष शेलार सातत्याने ठाकरे सरकारवर हल्लाबोल करत होते. त्यामुळे ते राजकीय वर्तुळात चर्चेत असतात. त्यासंबंधात धमकीचे फोन येतात का? की मध्यंतरी त्यांनी वांद्रे पश्चिम येथील ड्रग्ज माफियांचे रॅकेट पोलिसांकडून उद्‌ध्वस्त करायला लावले होते. त्याच्याशी या धमकीच्या फोनचा संबंध आहे का, असे तर्कवितर्क लढवले जात आहेत. ॲड. आशिष शेलार यांनी कालच वांद्रे पोलीस ठाण्यात यासंदर्भातली तक्रार नोंदवली होती. त्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी तपास करत मुंब्रा या ठिकाणाहून दोघांना अटक केली. त्यामुळे या धमकीच्या फोनबाबतचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागतील, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी अधिक तपास वांद्रे पोलीस करत आहेत.

## उद्धव ठाकरेंचा तोल सुटतोय!

### राज्यपालांशी अहंकाराने बोलणे अयोग्य; सोमय्या यांची टीका

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी):** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना धार्मिक स्थळे सुरू करण्यासाठी पत्र लिहिल्याबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांना उलट उत्तरी पत्र लिहिले आहे. त्यातून ठाकरे यांचा अहंकार दिसत असून राज्यपालांशी अहंकाराने बोलणे योग्य नव्हे असा सल्ला देतानाच, राज्य चालवता येत नसल्याने आणि कोरोना आटोक्यात येत नसल्याने उद्धव ठाकरे यांचा तोल सुटतोय, अशी टीका भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केली आहे.



कोरोनामुळे राज्यातील सर्व परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. ही सर्व परिस्थिती हाताळताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा गोंधळ उडत आहे. त्यामुळे ते वैफल्यग्रस्त झाले आहेत. परिणामी, त्यांचा तोल जाऊ लागला आहे, अशी टीका किरीट सोमय्या यांनी केली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी पाठवलेल्या पत्राला प्रत्युत्तर दिले. मात्र, त्या पत्रात त्यांच्या अहंकार ठोकावतो आहे. 'माझ्या हिंदुत्वाला आपल्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही' असे त्यांनी राज्यपालांना सांगितले आहे. या मुद्द्यावरूनही किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी खूप मोठी तडजोड केली. अशातच कोरोनामुळे राज्यातील परिस्थिती हाताबाहेर गेल्याने उद्धव ठाकरे यांना सध्या प्रत्येक गोष्टीचा राग येत आहे. त्यामुळेच राज्यपालांच्या पत्राला उत्तर देताना त्यांचा तोल गेला. राज्यपालांसारख्या वयस्कर व्यक्तीशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी अहंकारी भाषेचा वापर करणे, कितपत योग्य आहे, असा सवाल किरीट सोमय्या यांनी उपस्थित केला.

**VINYL CHEMICALS (INDIA) LIMITED**
CIN: L24100MH1986PLC039837
**Regd. Office:** Regent Chambers, 7th Floor, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai 400 021; **Tel:** 91 22 2282 2708 **Fax:** 91 22 2204 3969
**E-mail:** cs.vinylchemicals@pidilite.com **Website:** www.vinylchemicals.com

**NOTICE**

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47(1) of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015, that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Monday, 2nd November, 2020 to consider and take on record, inter alia, the Unaudited Financial Results (Provisional) for the second quarter and half-year ended 30th September, 2020.

The information contained in this Notice is also available on the Company's Website www.vinylchemicals.com and also on the Websites of BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com.

For Vinyl Chemicals (India) Ltd.
P.C. Patel
Secretary

Place: Mumbai
Date : 14.10.2020

**विद्या वर्धिनी संस्था**
**५४ वा वार्षिक अहवाल**
**वार्षिक सभेची सूचना**

'विद्या वधिनी संस्थे'च्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ०१/११/२०२० रोजी सकाळी ९.०० वा. विद्या निकेतन प्राथमिक शाळा, एम्.जी. रोड, वामन हरी पेठे ज्वेलर्सजवळ, गोरेगांव (प.), मुंबई– ४००१०४ येथे खालील कामकाज करण्यासाठी भरविण्यात येईल.

१. मागील दिनांक २३/०६/२०१९ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे व दि. ०९/११/२०१९ रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. कार्यकारिणीने सादर केलेला दिनांक ३१/०३/२०२० रोजी पूर्ण झालेल्या २०१९–२०२० या वर्षाचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३. दिनांक ३१/०३/२०२० रोजी पूर्ण झालेल्या वर्षाचे हिशेब व ताळेबंद त्यांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.
४. पुढील वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर करणे.
५. पुढील वर्षाकरिता सरकारमान्य हिशेबतपासनीसांची निवड करणे.
६. पुढील वर्षातील अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारी मंडळावरील घटना क्रमांक १६(ओ) प्रमाणे निवृत्त झालेल्या सभासदांच्या जागी ३ सभासदांची निवड करणे. घटना क्र.१६(ओ) प्रमाणे सर्वश्री १) श्री. सुधाकर मु. टिल्लू २) श्री. विश्वास वि. जोशी ३) श्री. आशिष म. पेंडसे हे निवृत्त होत असून पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास ते पात्र आहेत.
७. इमारत बांधकाम, निधी संकलन इत्यादी चर्चा व निर्णय.
८. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारे अन्य विषय वा कामांचा विचार करणे.

३२३, जवाहर नगर, विद्यावर्धिनी संस्था पथ,
गोरेगांव (प), मुंबई– ४००१०४
दिनांक : ११/१०/२०२०

**श्री. सुधाकर मु. टिल्लू**
**मानद् कार्यवाह**
**विद्या–वर्धिनी संस्था**

**टीप** : सरकारच्या कोविड–१९ संबंधीच्या नियमांचे पालन करून सभा भरविण्यात येईल.

**विशेष सूचना** :

१. गणसंख्येच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभा त्याच दिवशी सकाळी ठीक ९.३० वा. भरेल. त्या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. ज्या सभासदांना संस्थेच्या कार्यकारिणीवर काम करण्याची इच्छा आहे, अशा इच्छुक सभासदांनी विहीत नमुन्याचा अर्ज संस्थेच्या तात्पुरत्या कार्यालयात सभेच्या दिनांकापूर्वी किमान एक दिवस आधी पोहोचेल, अशा तऱ्हेने पाठवावा.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील किंवा काही माहिती हवी असेल तर त्यांनी लेखी विचारणा दि. २६/१०/२०२० पर्यंत संस्थेच्या तात्पुरत्या कार्यालयात करावी.
४. संस्थेचे हिशेब पूर्वसूचनेने सुट्टीचे दिवस वगळता संस्थेच्या तात्पुरत्या कार्यालयात सकाळी ९.३० ते १०.३० पर्यंत पहावयास मिळतील.

# पेण-पनवेलमधून खवले मांजराचे १२ किलो खवले जप्त

**मुंबई, दि. १३ (विशेष प्रतिनिधी) :** पेण आणि पनवेलमधून खवले मांजराच्या १२ किलो खवल्यांची तस्करी उघडकीस आली आहे. वन विभागाने केलेल्या कारवाईत एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व आरोपी कोकणातील आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा या प्राण्याच्या तस्करीचे 'कोकण कनेक्शन' उजेडात आले आहे.



जगामध्ये खवले मांजराच्या एकूण आठ प्रजाती आहेत. त्यामध्ये भारतीय उपखंडात चायनीज आणि भारतीय खवले मांजर या दोन प्रजाती आढळतात. या प्राण्याच्या अंगावरील खवल्यांना वन्यजीवांच्या आंतरराष्ट्रीय तस्करी बाजारात मोठी मागणी आहे. त्यामुळे या प्राण्यांची शिकार मोठ्या प्रमाणात होते. महाराष्ट्रातील कोकणपट्ट्यामध्ये भारतीय खवले मांजराचा अधिवास आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून कोकणातून सातत्याने या प्राण्याच्या तस्करीची प्रकरणे उघडकीस येत आहेत. अशीच एक तस्करी ११ ऑक्टोबर रोजी अलिबाग वन विभागातील अधिकाऱ्यांनी उघडकीस आणली. या प्रकरणाता पनवेल येथून नऊ किलो आणि पेणमध्ये टाकलेल्या धाडीत तीन किलो खवले मांजराचे खवले जप्त करण्यात आले. ११ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे वनकर्मचाऱ्यांनी पनवेल तालुक्यातील चिंचवण गावाजवळ महामार्गावर क्षणभर विश्रांती हॉटेलजवळ सापळा रचला. याठिकाणी मोटारसायकलवरुन आलेल्या तीन इसमांकडील पिशव्यांची तपासणी केल्यानंतर आम्हाला नऊ किलो खवले मिळाल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी पी. बी. मरले यांनी दिली. आरोपींची चौकशी केल्यानंतर त्यांनी दोन आरोपींची नावे सांगितली. या दोन्ही आरोपींना त्यांचा पेणमधील राहत्या घरत्यातून अटक करण्यात आली. त्यामधील एका आरोपीने पेणमधील जे.एस.डब्लू कंपनीजवळ असलेल्या शालीमार हॉटेलच्या परिसरात खवले मांजराच्या खवल्यांनी भरलेली बॅग टाकली होती. ही बॅग ताब्यात घेतल्यानंतर त्यामध्ये आम्हाला तीन किलो खवले सापडल्याचे मरले यांनी सांगितले. आरोपींमध्ये ज्ञानेश्वर शिवकर (रा.खारपाले), प्रविण जाधव (रा. दापोली), प्रतिश भोस्तेकर (माणगाव), सौरभ पाटील (खारपाले) आणि किरण पवार (रा. कळद) यांचा समावेश आहे.

आरोपी कोकणातील असल्याने खवले मांजरांचे 'कोकण कनेक्शन' पुन्हा एकदा समोर आले आहे. १२ किलो खवले ताब्यात घेतल्याने आरोपींनी किमान चार खवले मांजरांना मारल्याचा अंदाज आहे. ही कारवाई अलिबागचे उपवनसंरक्षक आशिष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक डी. एस.सोनावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी मरले आणि कर्मचाऱ्यांनी केली.